महाराष्ट्र शासन
वनविभाग
मुख्य वनसंरक्षक (प्रा.),ठाणे वनवृत्त, ठाणे यांचे कार्यालय
मायक्रो वेव्ह टॉवर, बारा बंगला एरिया, कोपरी कॉलनी ठाणे पूर्व, पिन- 400 603
दुरध्वनी क्रमांक - 022-25329642 / 25329865
Email: ccftthane@mahaforest.gov.in /ccfthane@gmail.com

---

**विषय :** एकरेषिय (Linear) प्रकल्पांबाबत कामे सुरु करणेसाठी परवानगी (Working Permission) देण्याबाबत.
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचा मौजे कशेळी, ता. भिवंडी, जि. ठाणे, महाराष्ट्र राज्य येथील मेट्रो लाईन 5 (Metro piers 5) बांधणेकरीता वन (संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत 0.6983 हेक्टर वनजमिन मागणी प्रस्ताव.

जा.क्र. कक्ष-10/वसं/प्र.क्र/23-24/जा.क्र.570/2023-24
ठाणे - 400 603, दिनांक - 15/02/2024.

**वाचा:-**

1) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा. नागपूर यांचेकडील पत्र क्र.कक्ष-17/ नोडल/ठाणे/आयडी-12921(79)/3264, दि.28.02.2023.
2) राज्य शासन, महसूल व वनविभाग यांचे पत्र क्र. एफएलडी-1223/सी.आर.102/फ-10, दि.21.04.2023.
3) केंद्र शासनाचे पर्यावरण, वन आणि वातावरण बदल, मंत्रालय क्षेत्रिय कार्यालय, नागपूर कडील पत्र क्र.एफ क्र.एफसी-I/एमएच-327/2023-एनजीपी/11637, दि.26.05.2023.
4) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांचेकडील पत्र क्र.Land/Desk-9/3195, दि.09.01.2024.
5) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई यांचेकडील पत्र क्र.Metro PIU/TP Unit/ML-5_Forest Clearance/83/2024, दिनांक 17.01.2024.
6) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांचेकडील पत्र क्र. कक्ष-3/अप्रमुवसं/ जमीन/2160, दि.14.02.2024.
7) केंद्र शासन पत्र क्र.एफ नं-11-306/2014/एफसी, दि.08.08.2014.
8) केंद्र शासन पत्र क्र.एफ नं-1-306/2014/एफसी, दि.15.01.2015.
9) पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.एफ नं. 11/306/2014, दि.07.05.2015.
10) शासन परिपत्रक क्र.एफएलडी-2015/प्र.क्र.77/फ-10, दिनांक 01.07.2015.
11) मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय) मुंबई यांचेकडील पत्र क्र.एफएलडी-1116/प्र.क्र.270/फ-10, दिनांक 20.07.2017

**आदेश -**

ज्याअर्थी, विषयांकित प्रस्तावावर कांदळवन कक्ष मुंबई / विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई यांचे मार्फत प्रस्तावावर संस्करण होत आहे. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व कैंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी वरिष्ठ नियोजक, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, बांद्रा, मुंबई यांचा मौजे कशेळी, ता. भिवंडी, जि. ठाणे, महाराष्ट्र राज्य येथील मेट्रो लाईन 5 (Metro piers 5) बांधणेकरीता वन (संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत 0.6983 हेक्टर वनजमिन मागणी प्रस्ताव उपरोक्त अनु. क्र.1 अन्वये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व कैंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना सादर झाला होता. आणि अनु.क्र.2 अन्वये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व कैंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी केंद्रशासनाचे पर्यावरण, वन आणि वातावरण बदल, मंत्रालय क्षेत्रिय कार्यालय नागपूर यांचेकडे सादर केला होता.

आणि ज्याअर्थी, वरिष्ठ नियोजक, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, बांद्रा, मुंबई या प्राधिकरणाकडून प्राप्त झालेला वळतेकरण प्रस्ताव भारत सरकारच्या वन (संवर्धन) अधिनियम, 1980 च्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रकल्प स्थळ विविक्षित (Site Specific) आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित क्षेत्रास Coastal Regulation Zone (CRZ) ची मान्यता काही अटी व शर्तींच्या अधिन राहून प्राप्त झाली आहे. सदर मान्यता पत्रातील अटी व शर्ती प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक आहे.

आणि ज्याअर्थी, विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष मुंबई, आणि अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व कैंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी प्रस्तावाची छाननी केल्यानंतर वन (संवर्धन) अधिनियम 1980 च्या तरतुदीनुसार 0.6983 हेक्टर कांदळवन वळतेकरणाची केंद्रशासनास शिफारस केली आहे.

आणि ज्याअर्थी, केंद्र शासनाने या प्रस्तावावर विचार करुन, अ.क्र.1 व 2 अन्वये सादर केलेल्या प्रस्तावास अ.क्र.3 अन्वये काही अटीं / शर्थीच्या अधिन राहून तत्वतः मंजुरी प्रदान केली आहे. केंद्रशासन तत्वत: मान्यता पत्रातील अटी / शर्तींचा पूर्तता अहवाल अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांनी संदर्भ क्र.4 अन्वये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व कैंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडे सादर करुन, अ.क्र.5 अन्वये प्रकल्प यंत्रणेने सदर प्रस्तावातील केंद्र शासनाच्या पत्रातील अटी-शर्तीची पुर्तता झालेली असल्यामुळे मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे यांना प्रकल्पांतर्गत क्षेत्रातील कामे सुरु करण्यास परवानगी मिळणेकामी विनंती केली आहे. तसेच अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांनी संदर्भ क्र.6 अन्वये प्रकल्पांतर्गत क्षेत्रात कामे सुरु करण्याची परवानगी देणेबाबत या कार्यालयास सूचित केले आहे.

आणि ज्याअर्थी, केंद्रशासन पत्रातील अटी / शर्तीनुसार विविध प्रयोजनासाठी प्रकल्प प्राधिकरणाने खालीलप्रमाणे रक्कम कॅम्पा प्राधिकरणाकडे हस्तांतरीत केलेली आहे.

| अ.क्र. | रक्कम हस्तातंरीत केल्याचा दिनांक | प्रयोजन | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1. | 21.07.2023 | वनाचे प्रत्याशी मूल्य (Net Present Value) | 10,03,227/- | सदर रक्कम कॅम्पा प्राधिकरणाकडे हस्तांतरीत केलेली आहे. |
| 2. | | पर्यायी वनीकरण (CA) | 4,19,755/- | |
| 3. | | पर्यायी वनीकरणाच्या क्षेत्राचे सर्व्हेक्षण व सिमांकन | 90,911/- | |
| 4. | 21.07.2023 | वृक्षतोडीकरीता आवश्यक रक्कम | 2,02,090/- | विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई यांचेकडे वर्ग करण्यात आले आहे. |
| | | एकूण | 17,15,983/- | -- |

आणि ज्याअर्थी, केंद्रशासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र.5 ला अनुसरुन प्रस्तावित वनक्षेत्रात कमीत कमी वृक्षतोड होईल याची दक्षता प्रकल्प यंत्रणेने घेणे आवश्यक आहे तसेच सदर वृक्षतोड विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई यांचे देखरेखेखाली होणे अपेक्षित आहे. प्रकल्प यंत्रणेने वृक्षनिष्कासनासाठी विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई यांचेकडे रु.2,02,090/- इतकी RTGS द्वारे जमा केलेली आहे.

आणि ज्याअर्थी, केंद्रशासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र.7 ला अनुसरुन प्रकल्प यंत्रणेने जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडील दिनांक 25.07.2023 रोजीचे वन हक्क कायदा, 2006 प्रमाणपत्र सादर केलेले आहे. बाबत प्रस्तावांतर्गत वनक्षेत्रात पट्टेधारक / पात्र प्लॉट धारक इत्यादी येत असल्यास नियमानुसार पुर्नवसन/मोबदला देण्याची जबाबदारी प्रकल्प यंत्रणेची राहील.

आणि ज्याअर्थी, केंद्रशासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र.8 ला अनसुरुन प्रकल्प प्राधिकरणाने प्रकल्प प्राधिकरणाने संयुक्त वनव्यवस्थापन समितींच्या सहभागाने रोपवाटीका तयार करून 1000 विविध वन प्रजातीची रोपे जसे बांबू, फळझाडे, औषधी वनस्पती, शोभिवंत आणि स्वदेशी / स्थानिक रोपे 10 वर्षासाठी तयार करण्यात यावीत व त्यातील 50% रोपे प्रकल्पांतील प्रस्तावित वनक्षेत्रा सभोवती लावणे आणि उर्वरीत 50% रोपे लागवडीसाठी स्थानिकांना त्यांच्या निवडीप्रमाणे वाटप करणे आवश्यक आहे. संबंधित संयुक्त वनव्यवस्थापन समितीने रोपे लागवडीचा / रोपे वाटपाचा अभिलेखा जतन करून ठेवावा. याबाबत प्रकल्प यंत्रणेने बंधपत्र सादर केलेले आहे.

आणि ज्याअर्थी, केंद्र शासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र.12 ला अनुसरुन सदर प्रस्तावात 31 कांदळवन वृक्षाची तोड असल्यामुळे प्रकल्प प्राधिकरणाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेले रिट याचिका क्रमांक 10710/2023 मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक 10.01.2024 रोजी 31 कांदळवन वृक्षांच्या तोडीस काही अटी / शर्तींच्या अधिन राहून मान्यता दिली आहे, सबब त्यापेक्षा अधिक कांदळवन वृक्षांची तोड होणार असल्यास मा. उच्च न्यायालयाची मान्यता प्रकल्प यंत्रणेने घेणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, राज्य शासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र.13 ला अनुसरुन प्रकल्प यंत्रणेने सदर प्रकल्पासाठी आवश्यकतेनुसार पर्यावरणीय मान्यता मिळविणे अपेक्षित आहे. त्यास अनुसरुन प्रकल्प यंत्रणेने मेट्रो लाईन प्रकल्पास Environmental (Protection) Act, 1986 अनुसार आवश्यकता नसलेबाबतचे पत्र सादर केलेले आहे.

आणि ज्याअर्थी, केंद्रशासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र.17 मध्ये वळतेकरण क्षेत्राचे सीमांकन प्रकल्प यंत्रणेच्या खर्चाने वनविभागाच्या देखरेखीखाली करावयाचे आहे. बाबत प्रकल्प यंत्रणेने कॅम्पा प्राधिकरणाकडे रक्कम रुपये 90,911/- अदा केलेले आहे.

आणि ज्याअर्थी, वरील अ.क्र.7 व 8 अन्वये एकरेषीय प्रकल्पा संदर्भात केंद्र शासनाने मार्गदर्शक सूचना जारी केलेले आहेत. तसेच केंद्रशासनाने वरील अ.क्र.9 अन्वये वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत एकरेषीय प्रकल्पांना (Linear Projects) तत्वतः मान्यता मिळाल्यानंतर काही अटींच्या अधिन राहून काम सुरु करण्यास व झाडे तोडण्यास परवानगी देणे बाबत सर्वसाधारण मान्यता दिली आहे.

आणि ज्याअर्थी, वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत नवीन रस्ते, अस्तित्वात असलेले महामार्गाचे रुंदीकरण, ट्रान्समिशन प्रा., पाण्याची पाईप प्रा., ऑप्टीकल फायबर केबल प्रा., रेल्वे प्रा. इत्यादी एकरेषिय (Linear) प्रकल्पांना तत्वतः मान्यता दिल्यानंतर प्रकल्पांचे काम जलद गतीने सुरु करुन सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सदर तत्वतः मान्यता दिलेल्या पत्रातील आवश्यक अटींची पूर्तता प्रकल्प यंत्रणेने केल्यानंतर प्रकल्पांतर्गत वन जमिनीवरील झाडे तोडण्यास व कामे सुरु करणेसाठी परवानगी देण्याकरिता राज्य शासनाचे वरील अ.क्र.10 चे परिपत्रकातील अटीस अधीन राहून अशी परवानगी देणेसाठी मुख्य वनसंरक्षक (प्रा.) यांना प्राधिकृत केले आहे.

आणि ज्याअर्थी, कांदळवन कक्षाकडील अन्य प्रकरणात आवश्यक अटींची पूर्तता होत असल्यास प्रकल्प यंत्रणेस कामे सुरु करण्यास परवानगी देणेस हरकत नसल्याबाबत राज्य शासनाने वरील अ.क्र.11 अन्वये कळविले आहे.

म्हणून आता याव्दारे असे निर्देश देत आहे की, सदरचा प्रकल्प एकरेषीय असल्यामुळे व याबाबत केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचना अस्तित्वात असल्यामुळे प्रकल्प प्राधिकरण म्हणजेच वरिष्ठ नियोजक, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, बांद्रा, मुंबई यांचा मौजे कशेळी, ता. भिवंडी, जि. ठाणे, महाराष्ट्र राज्य येथील मेट्रो लाईन 5 (Metro piers 5) बांधणेकरीता वन (संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत 0.6983 हेक्टर वनजमिन मागणी प्रस्तावास खाली दिलेल्या अनुसूची मध्ये नमूद केलेल्या क्षेत्रात कामे सुरु करणेस परवानगी (Working Permission) देण्यात येत आहे. ही परवानगी खालील अटी/शर्ती पूर्ततेच्या अधिन राहून देण्यात येत आहे :-

1) सदर परवानगी प्रकल्पांतर्गत प्रस्तावित वळतेकरण क्षेत्रात कामे सुरु करणे व झाडे तोडण्यापुरती मर्यादित आहे. आणि सदर परवानगी एक वर्षासाठीच म्हणजेच दि.15.02.2025 पर्यंतच वैध (Valid) राहील म्हणजेच दिनांक 16.02.2025 पासून आपोआप रद्द झालेचे समजण्यात येईल. सदर परवानगी जारी झाल्यानंतर एक वर्षाचे कालावधीत प्रकल्प यंत्रणेस केंद्र शासन तत्वत: व अंतीम मान्यता पत्रातील सर्व अटी व शर्तींची पूर्तता करून राज्य शासनाकडून वळतेकरण आदेश

प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. सदर परवानगीस मुदतवाढ देणे या कार्यालयाच्या अधिकारात येत नसल्याने एक वर्षाचा कालावधी उलटून गेल्यानंतर प्रस्तावांतर्गत क्षेत्रात काम सुरु ठेवण्यासाठी या कार्यालयास पत्रव्यवहार प्रकल्प यंत्रणेस करता येणार नाही.

2) केंद्रशासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र.5 ला अनुसरुन प्रस्तावित वनक्षेत्रात कमीत कमी वृक्षतोड होईल याची दक्षता प्रकल्प यंत्रणेने घेणे आवश्यक आहे तसेच सदर वृक्षतोड विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई यांचे देखरेखेखाली होणे आवश्यक आहे. प्रकल्प यंत्रणेने वृक्षनिष्कासनासाठी विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई यांचेकडे रु.2,02,090/- इतकी RTGS द्वारे जमा केलेली आहे.

3) केंद्रशासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र.7 ला अनुसरुन प्रकल्प यंत्रणेने जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडील दिनांक 25.07.2023 रोजीचे वन हक्क कायदा, 2006 प्रमाणपत्र सादर केलेले आहे. बाबत प्रस्तावांतर्गत वनक्षेत्रात पट्टेधारक / पात्र प्लॉट धारक इत्यादी येत असल्यास नियमानुसार पुर्नवसन/मोबदला देण्याची जबाबदारी प्रकल्प यंत्रणेची राहील.

4) केंद्रशासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र.8 ला अनसुरुन प्रकल्प प्राधिकरणाने प्रकल्प प्राधिकरणाने संयुक्त वनव्यवस्थापन समितींच्या सहभागाने रोपवाटीका तयार करून 1000 विविध वन प्रजातीची रोपे जसे बांबू, फळझाडे, औषधी वनस्पती, शोभिवंत आणि स्वदेशी / स्थानिक रोपे 10 वर्षासाठी तयार करण्यात यावीत व त्यातील 50% रोपे प्रकल्पांतील प्रस्तावित वनक्षेत्रा सभोवती लावणे आणि उर्वरीत 50% रोपे लागवडीसाठी स्थानिकांना त्यांच्या निवडीप्रमाणे वाटप करणे बंधनकारक आहे. संबंधित संयुक्त वनव्यवस्थापन समितीने रोपे लागवडीचा / रोपे वाटपाचा अभिलेखा जतन करुन ठेवावा. याबाबत प्रकल्प यंत्रणेने बंधपत्र सादर केलेले आहे.

5) केंद्रशासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र.12 ला अनुसरुन सदर प्रस्तावात 31 कांदळवन वृक्षाची तोड असल्यामुळे प्रकल्प प्राधिकरणाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेले रिट याचिका क्रमांक 10710/2023 मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक 10.01.2024 रोजी 31 कांदळवन वृक्षांच्या तोडीस काही अटी / शर्तींच्या अधिन राहून मान्यता दिली आहे, सबब त्यापेक्षा अधिक कांदळवन वृक्षांची तोड होणार असल्यास मा. उच्च न्यायालयाची मान्यता प्रकल्प यंत्रणेने घेणे बंधनकारक आहे.

6) केंद्र शासनाकडून अ.क्र.17 मध्ये वळतेकरण क्षेत्राचे सीमांकन प्रकल्प यंत्रणेच्या खर्चाने वनविभागाच्या देखरेखीखाली करणे बंधनकारक आहे. बाबत प्रकल्प यंत्रणेने कॅम्पा प्राधिकरणाकडे रक्कम रुपये 90,911/- अदा केलेले आहे.

7) वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत केंद्र शासन तत्वतः मान्यता मिळालेल्या पत्रातील अटींची पुर्तता प्रकल्प प्राधिकरणाकडून काटेकोरपणे होईल याबाबत दक्षता घ्यावी. प्रकल्प यंत्रणा सर्व अटींचे तंतोतंत पालन करेल याची विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक हे खात्री करतील. आणि वेळोवेळी याबाबतचा अहवाल अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष मुंबई यांना सादर करतील.

8) प्रकल्प यंत्रणेने प्रस्तावीत क्षेत्रात काम सुरु करण्यापूर्वी, विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई यांना कळविणे आवश्यक आहे. विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई यांनी कामे सुरु असतांना प्रस्तावित वन जमीनीवर वनभंग झाला आहे का ते पाहणे, वनभंग झाल्याचे निर्दशनास आल्यास केंद्र शासनाचे पर्यावरण, वन व जलवायु मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडील Hand Book मधील परिच्छेद क्र.1.21 अनुसार कारवाई करतील.

9) प्रकल्पामुळे प्रकल्पांतर्गत क्षेत्रातील पक्षी / वन्यजीवांचे वस्तीस्थान नष्ट न होता अबाधित राहण्याकरीता काही उपाययोजना सुचविल्यास आवश्यक ती उपाययोजना प्रकल्प यंत्रणा करेल.

10) प्रकल्पांतर्गत वनक्षेत्रात प्रकल्प प्राधिकरणाकडून कामे करताना वन संपदेचे नुकसान होणार नाही, याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

11) केंद्रशासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र.1, 4b, 5, 8, 9, 12, 14, 15, 16, 18, 19, 20, 21, 22, 23 व 24 बाबत प्रकल्प यंत्रणेने दिलेले बंधपत्रातील मुद्द्यांबाबत प्रकल्प प्राधिकरणाकडून विहित कालावधीत पूर्तता केली जाईल याबाबत विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई यांची जबाबदारी राहील.

उपरोक्त अटीं पैकी कोणत्याही अटींचे अनुपालन न केल्यास (Non Compliance) संबंधित उपवनसंरक्षक, वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत केंद्र शासनाचे पर्यावरण, वन व जलवायु मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडील Hand Book मधील परिच्छेद क्र.1.21 अनुसार अहवाल सादर करतील.

**अनुसूची**

| गावांचे नांव | तालुका | सर्व्हे नंबर / CTS No. | वैधानिक दर्जा | क्षेत्र हेक्टर |
|---|---|---|---|---|
| कशेळी | भिवंडी | 194 बी | राखीव वन | 0.3771 |
| कशेळी | भिवंडी | खाडी | कांदळवन क्षेत्र | 0.3212 |
| | | **एकूण** | | **0.6983** |

सदर आदेशाची प्रत स्थानिक संस्था, पंचायत, नगरपालिका, नगरपरिषद आणि संबंधित शासकीय कार्यालयाचे प्रमुख यांना पाठविण्यात यावी. तसेच सदर आदेश त्यांच्या कार्यालयातील सूचना फलकावर, सर्वसामान्य जनतेच्या माहितीसाठी प्रदर्शित करावी.

सदर आदेश महाराष्ट्र शासन वनविभागाचे www.mahaforest.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात येत आहे.

स्वा/-
**(के. प्रदिपा)**
**मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे**

प्रति,

विभागीय वन अधिकारी,
मुंबई कांदळवन (संधारण) घटक, मुंबई.

प्रतिलिपी :- प्रधान सचिव (वने), मंत्रालय, मुंबई यांचेकडे माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर.

प्रतिलिपी :- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक आणि केंद्रस्थ अधिकारी, नागपूर यांचेकडे माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर.

प्रतिलिपी :- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष मुंबई यांजकडे माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी सादर.

प्रतिलिपी :- जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडे माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित.

प्रतिलिपी :- सिनीयर प्लानर, मेट्रो पीआययु, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई यांजकडे माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

.2.00 निर्देशित करण्यात येते की, या संदर्भातील सर्व आदेश आणि केंद्र शासनाने मान्यतेच्या आदेशात घातलेल्या अटी व संरक्षित बाबी यांच्यासह एका स्थानिक भाषेतील व एक इंग्रजी भाषेतील प्रसिध्द अशा दोन दैनिक वृत्तपत्रात प्रसारित करावेत. आणि त्याची प्रत विभागीय वनअधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई आणि संबंधित विभागास देण्यात यावी.

प्रतिलिपी :- एकरेषिय प्रकल्प निवड नस्ती, वनवृत्त कार्यालय ठाणे.

प्रतिलिपी - कक्ष-11 (तांत्रिक), वनवृत्त कार्यालय ठाणे यांचेकडे वरील आदेश शासनाच्या वेबसाईटवर अपलोड करणेकरीता रवाना.

K.P.

**(के. प्रदिपा)**
**मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे**